नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २८० Issue - 280 | वार रविवार दि. १ मार्च २०२६ Blow- Sunday Date 1 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# आंध्र प्रदेशमध्ये फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट, २० जणांचा जागीच मृत्यू



## सहा जण गंभीर जखमी; गंभीर भाजलेल्यांपैकी अनेकांची प्रकृती गंभीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद : आंध्र प्रदेशातील काकीनाडा जिल्ह्यातील समलकोट मंडल येथील वेतलापलेम येथील एका फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट झाला आहे. यामध्ये २० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. कारखान्यात २० हून अधिक लोक उपस्थित होते.

स्फोटाची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. आग विझवण्याचा प्रयत्न सुरू केला. स्थानिक रहिवाशांनीही मदत केली. जखमींना रुग्णवाहिकेने रुग्णालयात नेण्यात आले. गंभीर भाजलेल्यांपैकी अनेकांची प्रकृती गंभीर आहे. स्फोटात मृतदेहांचे तुकडे झाले आणि जवळच्या इमारतींचेही मोठे नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे.

आत्तापर्यंतचा राज्यातील सर्वात मोठा स्फोट

हा आत्तापर्यंतचा राज्यातील सर्वात मोठा स्फोट असल्याची माहिती पर्यटनमंत्री दुर्गेश यांनी दिली आहे. अद्याप संपूर्ण माहिती मिळालेली नाही. सध्या काही जखमी झालेल्या लोकांवर उपचार सुरु आहेत. समरलाकोटा मंडलच्या वेट्टलापलेम गावात झालेल्या स्फोटाची तीव्रता इतकी जास्त होती की मृतदेह जवळच्या भातशेतीत पडले आहेत. काकीनाडा सरकारी जनरल हॉस्पिटलच्या अधीक्षकांनी सांगितले की, ९० ते १०० टक्के भाजलेल्या सात रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी व्यक्त केला शोक

दरम्यान, या घटनेबद्दल आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी शोक व्यक्त केला आहे. काकीनाडा जिल्ह्यातील वेट्टलापलेम गावात फटाके उत्पादक युनिटमध्ये झालेल्या स्फोटात झालेली जीवितहानी अत्यंत दुःखद आहे असे ते म्हणाले. हिरव्यागार भातशेतींमध्ये भयानक दृश्ये दिसत आहे. स्थानिक लोक बरकालू (खताच्या पोत्यांपासून बनवलेल्या चादरी) मध्ये मृतदेह घेऊन जाताना दिसले. स्फोटाच्या ठिकाणाहून आग आणि धूर येत होता आणि जखमींना वाचवण्यासाठी तातडीने रुग्णवाहिका घटनास्थळी रवाना करण्यात आल्या आहेत.

# इस्त्रायल–इराण युद्ध पेटलं, भारताची अधिकृत भूमिका जाहीर, नागरिकांसाठी ॲडव्हायजरी जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पश्चिम आशियामध्ये इराण आणि इस्त्रायलमध्ये भीषण युद्धाला सुरुवात झाली असून परिस्थिती अत्यंत तणाव-पूर्ण बनली आहे. शनिवारी (२८ फेब्रुवारी २०२६) इस्त्रायलने अमेरिकेसोबत संयुक्त कारवाई करत इराणवर हल्ला चढवला. त्यानंतर तेहराननेही तातडीने प्रत्युत्तर देत पश्चिम आशियामधील अमेरिकन एअरबेसवर क्षेपणास्त्र हल्ले केल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारकडून अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आली आहे. वाढत्या संघर्षामुळे जागतिक पा-तळीवर चिंता व्यक्त केली जात आहे.

परराष्ट्र मंत्रालय (चए) यांनी इस्त्रायल-इराण संघर्षाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. मंत्रालयाने म्हटले आहे की, इराण आणि आखाती प्रदेशातील अलीकडील घडामोडींमुळे भारत अत्यंत चिंतित आहे. सर्व संबंधित पक्षांनी संयम बाळगावा, तणाव वाढू नये यासाठी प्रयत्न करावेत आणि सामान्य नागरिकांच्या सुर-क्षेला प्राधान्य द्यावे, असे आव-ाहन करण्यात आले आहे. भार-ताने स्पष्ट केले की या प्रदेशातील तणाव कमी करण्यासाठी संवाद आणि कूटनीती हाच योग्य मार्ग आहे. अंतर्गत प्रश्न सोडवण्यासाठी शांततापूर्ण चर्चा व्हावी, तसेच सर्व देशांच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचा सन्मान राखला जावा, असेही मंत्रालयाने नमूद केले.



परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की संबंधित देशांमधील भारतीय दूतावास भारतीय नागरिकांच्या सतत संपर्कात आ-हेत. नागरिकांनी सतर्क राहावे, स्थानिक सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे आणि दूतावासाशी संपर्कात राहावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधात मोठ्या लष्करी मोहिमेची घोषणा केल्यानंतर भारताने इस्त्रायल आणि इराणमध्ये राहणाऱ्या आपल्या नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे. इराणमधील भारतीय दूतावासाने नागरिकांना शक्यतो घरातच राहा-वे, परिस्थितीवर लक्ष ठेवावे आणि पुढील सूचनांची प्रतीक्षा करावी, असे आवाहन केले आहे.

इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या नेतृत्वावर तीव्र टीका केली. इरा-णला अण्वस्त्र सज्ज होऊ देणे मानवतेसाठी धोकादायक ठरेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. इराणकडून दीर्घकाळ आक्रमक भूमिका घेतली जात असल्याचा आरोप करत त्यांनी जागतिक समूदायाने याकडे गांभीर्याने पाहण्याचे आवाहन केले.

# इराण नौदलाचा विनाश करू, सर्व मिसाईल नष्ट केल्या जातील; ट्रम्प यांची दर्पोक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : इस्त्रायल आणि अमेरिकेनं संयुक्त कारवाई लष्करी कारवाई करताना इराणची राजधानी ते-हरानसह अनेक शहरांवर हल्ला केला आहे. भारतीय वेळेनुसार आज (२८ फेब्रुवारी) सकाळी तेहरानसह अनेक शहरांम ध्ये स्फोटांचे आवाज ऐकू आले आणि हवाई हल्ल्याचे सायरन वाजले. अल जझीराने अमेरिकन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे की ही अमेरिका आणि इस्त्रायलमधील संयुक्त लष्करी कारवाई आहे. तेहरानमध्ये आतापर्यंत ज्या ठिकाणी हल्ला झाल्याचे वृत्त आहे त्यात गुप्तचर मंत्रालय, संरक्षण मंत्रालय, सर्वोच्च नेते खमेनी यांचे कार्यालय आणि इराणी अणुऊर्जा संघटना यांचा समावेश आहे. हल्ल्यानंतर खमेनी यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले. इराणने इस्त्रायलवर प्रत्युत्तरात्मक हल्लेही सुरू केले आहेत. इराणने प्रत्युत्तर म्हणून सुमारे ४०० क्षेपणास्त्रे डागली आ-हेत.





इराण नौदल संपवण्याचा इशारा

अणुशस्त्रांबाबत इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या वाटाघाटींदरम्यान हा हल्ला झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इरा-णवर हल्ला करण्याची धमकी दिली होती. त्यांनी सांगितले की या कारवाईचा उद्देश अमेरिका आणि तिच्या लोकांना धोक्यापासून वाचवणे आहे. ट्रम्प यांच्या मते, अमेरिकन सैन्य इराणची क्षेपणास्त्रे नष्ट करण्याचा आणि त्यांचा क्षेपणास्त्र कार्यक्रम नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. ट्रम्प यांनी सांगितले की इराणमधील अमेरिकेची लष्करी कारवाई मोठी आणि सतत सुरू आहे. त्यांनी सांगितले की या कारवाईचा उद्देश अमेरिका आणि तेथील लोकांना धोक्यापासून वाचवणे आहे. अमेरिकन सैन्य इराणची क्षेपणास्त्रे नष्ट करण्याचा आणि त्यांचा क्षेप-णास्त्र कार्यक्रम नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. ट्रम्प यांनी इराण नौदल संपवण्याचा इशारा दिला आहे.

**अण्वस्त्रे मिळू दिली जाणार नाहीत, अमेरिकन सैन्य दलाच्या अफाट शक्तीची जाणीव करून दिली जाईल**

अमेरिकन सैनिकांना आपले प्राण गमवावे लागू शकतात

त्यांनी असेही म्हटले की जूनमध्ये इराणच्या अणुसुत्रांवर हल्ला झाल्यानंतरही, इराण अजूनही आपला अणुकार्यक्रम पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहे. ट्रम्प यांनी सांगितले की इराणने आपला अणुकार्यक्रम सोडण्याचा कोणताही पर्याय शोधला नाही, त्यामुळे आता जास्त वाट पाहण्याची गरज नाही. ट्रम्प यांनी सांगितले की इराणमध्ये सुरू असलेल्या लष्करी कारवाईदरम्यान काही अमेरिकन सैनिकांना आपले प्राण गमवावे लागू शकतात. त्यांनी सांगितले की युद्धामुळे जीवितहानी होऊ शकते, परंतु भविष्यातील सुरक्षिततेसाठी हे पाऊल उचलले जात आहे.

बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांवरून सतत वाद

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्याची धमकी (पान २ वर...)

# इस्त्रायलचा इराणची राजधानी तेहरानवर हल्ला, आकाशात धुराचे लोट पसरले; अमेरिकेशी चर्चा सुरु असतानाच हल्ला; तेल अविवमधील सर्व उड्डाणे रद्द

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : इस्त्रायलने इराणची राजधानी ते-हरानवर हल्ला केल्याचे वृत्त आहे. अणु करारावरून अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आणि मध्य पूर्वेत अमेरिकेच्या संभाव्य हल्ल्याच्या भीतीच्या पार्श्वभूमीवर हा हल्ला करण्यात आला आहे. स्थानिक माध्यमांचा हवाला देत, रॉयटर्सने वृत्त दिलं आहे. तेहरानच्या युनिव्हर्सिटी स्ट्रीट आणि जोम होरी भागात अनेक क्षेपणास्त्रे पडली, तर तेहरानच्या मध्यभागी पाश्चर स्ट्रीटवरून दाट धुराचे लोट उठताना दिसत होते.

इस्त्रायलने आणीबाणीची स्थिती जाहीर केली

हल्ल्यानंतर इस्त्रायलने आणीबाणीची स्थिती जाहीर केली. गेल्या काही मि निटांत, इस्त्रायलमध्ये सायरन वाजले आणि सुरक्षित ठिकाणांजवळ राहण्यासाठी सेल्युलर उपकरणांना प्रगत सूचना देण्यात आल्या. इस्त्रायलकडे क्षेपणास्त्रे डागण्याची शक्यता असल्याने जनतेला तयार करण्यासाठी हा इशारा देण्यात आला आहे. आयडीएफने लोकांना सुरक्षित ठिकाणांजवळ राहण्याचे आवाहन केले आहे. तेल अविवमधील सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.





**कतारने सुरक्षित ठिकाणी राहण्याचा सल्ला दिला**

कतारमधील अमेरिकन दूतावासाने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी राहण्याचे निर्देश दिले आ-हेत. दूतावासानेही आपल्या नागरिकांना पुढील सूचना मि ळेपर्यंत असेच करण्याचा सल्ला दिला आहे.

**इस्त्रायलने हवाई क्षेत्र बंद केले**

इस्त्रायलच्या वाहतूक मंत्री मिरी रेगेव्ह (पान २ वर...)

## अजित पवारांच्या विमान अपघाताची कारणे काय?

## एएआयबीकडून २२ पानांचा प्राथमिक रिपोर्ट जारी

# अखेर एएआयबीकडून प्राथमिक चौकशी अहवाल जारी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघा-ताचा प्राथमिक चौकशी अहवाल समोर आला आहे. खइ कडून हा प्राथमिक अहवाल जारी करण्यात आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या प्राथमिक अहवालाची प्रतिक्षा होती. अजित पवार यांच्या अपघात प्रकरणात तपास नेमका कुठपर्यंत आला? याबाबत सर्वांना प्रतिक्षा होती. अखेर एएआयबीकडून प्राथमिक चौकशी अहवाल जारी करण्यात आला आहे. या अहव-ालानुसार, खराब हवामान, पायाभूत सुविधांची कमतरता आणि ऑपरेशनल निर्णय यांच्या संयोगामुळे हा अपघात घडल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पण या अपघाताची अंतिम कारणे हे उतठ/ऋऊ सविस्तर विश्लेषणानंतर स्पष्ट होईल, असं सांगण्यात आलं आहे. जवळपास २२ पानांचा हा प्राथमिक अहवाल आहे.

या अपघाताचा तपास विविध यंत्रणांकडून सुरु आहे. यामध्ये अळीलीरषीं अललळवशपीं खप-ींशीींळसरींळेप ईीशर्री (अअखइ) चा देखील समावेश आहे. या तप-ासात अपघाताची नेमकी कारणे काय आहेत, ते शोधण्याच्या दृष्टीकोनातून तपास केला जात आहे. २२ पानांच्या अहवालात तपास नेमका कुठपर्यंत आला आहे, कोणत्या त्रुटी आतापर्यंत आढळल्या आहेत आणि आणखी कोणत्या मुद्द्यांवर तपास सुरु आहे, याबाबत माहिती देण्यात आली आहे.

अपघाताच्या वेळी दृश्यमानता कमी होती, असं अहवालात नमूद करण्यात आलं आहे. अपघाताच्या वेळी बारामतीत दृश्यमानता ही केवळ ३ किमी इतकी होती. पण तज्ञ नियमानुसार विमान लँडिंगसाठी किमान दृश्यमानता ही ५ किमी हवी. अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या वेळी ती ३ किमी होती. त्यामुळे पहिल्या लँडिंच्या प्रयत्नावेळी 'गो-अराउंड'चा सल्ला देण्यात आला.

यानंतर लँडिंगच्या दुसऱ्या प्रयत्नावेळी अपघाताची घटना घडली. विमान दुसऱ्या प्रयत्नात लँडिंग करत असताना धावपट्टीच्या डाव्या बाजूस कोसळले. विमान आधी झाडावर आपटले, त्यानंतर विमानाला आग लागली. या दुर्घटनेत कॉकपिट आणि केबिन पूर्णपणे जळून खाक झाले.

या अहवालात विमानतळावर योग्य हवामान सुविधा नव्हती, असं निरीक्षण नोंदवण्यात आलं आहे. तसेच धावपट्टीवरील मार्किंग फिकी झाली होती आणि रनवेवर बारीक खडी आढळली. तसेच विमानतळावर योग्य फायर-फायटिंग यंत्रणा उपलब्ध नव्ह-ती. फ्लाईट डेटा रेकॉर्डरमधील माहिती डाउनलोड करण्यात आली आहे. तर कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डरची माहिती मिळवण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. ते काम देखील प्रगतीत आहे, अशी माहिती अहवालात देण्यात आली आहे.

## इराण नौदलाचा विनाश करू, सर्व मिसाईल नष्ट केल्या जातील; ट्रम्प यांची दर्पोक्ती

(पान १ वरून..) दिली होती. अमेरिकन सैन्याने आधीच इराणला वेढले आहे. अमेरिकेने आपल्या नागरिकांना ताबडतोब इस्रायल सोडण्यास सांगितले होते. इराण आणि अमेरिकेदरम्यान सुरू असलेल्या अणुकरार वाटाघाटींमध्ये बॅलिस्टिक क्षेपणास्त्र प्रकल्प हा वादाचा सर्वात मोठा मुद्दा बनला आहे. इराण या मुद्द्यावर अजिबात तडजोड करण्यास तयार नाही आणि तो त्याला रेड लाईन मानतो. इराण म्हणतो की त्यांचा बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रम संरक्षणासाठी आवश्यक आहे.जेव्हा इस्रायल आणि अमेरिकेने जून २०२५ मध्ये इस्रायलच्या अणुस्थळांवर हल्ला केला तेव्हा इराणच्या क्षेपणास्त्रांनी त्यांचे संरक्षण केले.

दुसरीकडे, इस्रायली सैन्याचे म्हणणे आहे की इराणकडून डागण्यात आलेली क्षेपणास्त्रे इस्रायलच्या दिशेने जाताना दिसली, ज्यामुळे देशाच्या अनेक भागात सायरन वाजले. उत्तर इस्रायलमध्ये स्फोट ऐकू आले. इस्रायली हवाई संरक्षण प्रणाली इराणकडून येणाऱ्या क्षेपणास्त्रांना रोखण्याचा प्रयत्न करत होती. हल्ल्यात झालेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा जीवितहानीबद्दल तात्काळ माहिती मिळालेली नाही.

## इस्त्रायलचा इराणची राजधानी तेहरानवर हल्ला, आकाशात धुराचे लोट पसरले; अमेरिकेशी ....

(पान १ वरून..) यांनी घोषणा केली की सुरक्षेच्या कारणास्तव, त्यांनी नागरी उड्डाणांसाठी इस्रायली हवाई क्षेत्र बंद करण्याचे आदेश दिले आहेत. त्या म्हणाल्या, प्रवाशांची सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. पुढील सूचना येईपर्यंत नागरिकांना विमानतळांवर प्रवास करू नये अशी विनंती आहे. हवाई क्षेत्र पुन्हा उघडल्यावर उड्डाण वेळापत्रकाची माहिती घेण्यासाठी परदेशातील प्रवाशांना माध्यमांशी आणि विमान कंपन्यांशी संपर्क साधण्याची विनंती करण्यात आली आहे. सुरक्षा परिस्थिती सामान्य होताच हवाई क्षेत्र पुन्हा सुरू केले जाईल आणि इस्रायलला आणि येथून येणाऱ्या उड्डाणे पुन्हा सुरू होतील, असे त्यांनी सांगितले.

# पंतप्रधान मोदी यांच्या निषेधार्थ निफाड युवक काँग्रेसचे धरणे आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : २०१४ साली भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेत आल्यापासून भारतीय राजकारणाचा व समाजकारणाचा समतोल बिघडवला असून आज भारतीय अर्थव्यवस्था ही संकटात सापडली आहे. अमेरीकेतून निर्यात करण्यात येणारे वस्तूंवर शून्य टक्के कर लावण्यात आले भारतीय वस्तूंवरील कर १८ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आलेली आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये विदेशी कर्ज हे १०% ने वाढले. रशियाकडून स्वस्त दराने मिळण्यात येणारे तेल आता अमेरिकेकडून वाढीव किमतीने घेण्यात येत आहे याचा थेट फटका हा ग्राहकांना बसत आहे. अमेरिकेतील एपस्टीन सारख्या आंतरराष्ट्रीय लैंगिक राकेट चालवणाऱ्या व्यक्ती वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये अडकलेल्या असताना देशाचे पंतप्रधान मोदी हे त्यांच्याकडून वेळोवेळी सल्ला घेतात याचा नेमका अर्थ काय ? अमेरिकेतून करण्यात आलेल्या आयातीमुळे देशात सुरू असलेले मेक इन इंडिया चे काय होणार ? भारताच्या विदेश नीती, अर्थनीती व आरोग्य निती या सर्व अमेरिका ठरवणार असतील तर देशातील नेतृत्व करण्यास पंतप्रधान मोदी असमर्थ आहे यावरून स्पष्टपणे दिसून येत आहे या सर्व प्रकाराचा जाहीर निषेध करत देशाला महान बनवण्यापेक्षा गहान ठेवण्याकडे लक्ष असणाऱ्या नरेंद्र मोदींचा जाहीर निषेध करून राजीनामा द्यावा अशी मागणी निफाड विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष सचिन खडताळे यांनी करून नायब तहसीलदार राहुल मुळीक यांना निवेदन दिले. निफाड विधानसभा युवकांचे वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात निफाड नगरपंचायत समोर धरणे आंदोलन ठेवले होते त्यामध्ये हे निवेदन देण्यात आले निवेदनात युवक काँग्रेस च्या प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

१) नरेंद्र मोदींनी पत्रकार परिषद घेऊन जेफ्री एपस्टाईन सोबत कोणत्या प्रकारचे संबंध ते जाहीर करावे.

२) जेफ्री एपस्टाईन आणि नरेंद्र मोदी यांच्या पक्षातील लोकांचे संबंध उघड करावे?

३) नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा द्यावा व त्यांचे सहकारी मंत्री हरदीप पुरी यांचा हि राजीनामा घ्यावा.

४) अन्यथा नरेंद्र मोदी यांनी पत्रकार परिषद घेऊन या घटनेचा खुलासा लोकांसमोर करावा.

५) अमेरिके सोबत केलेले ट्रेड डिल रद्द करावे.

६) युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय चिब यांना बेकायदेशीर अटक का केली.

७) काँग्रेस प्रवक्ते हनुमंत पवार यांना मारहाण करणाऱ्यावर कठोरपणे कारवाई करण्यात यावी.

जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष गौरव दादा पानगव्हाणे, जिल्हा सरचिटणीस सचिन होळकर, निफाड तालुका काँग्रेस कमीटीचे अध्यक्ष विनायकराव शिंदे, तालुका सरचिटणीस




सुहास सुरळीकर, युवा जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र गीते, जेष्ठ नेते भैय्यासाहेब देशमुख,निलेश चव्हाण,निफाड शहराध्यक्ष स्वप्निल बिनायकिया,सचिव सौरभ पगारे आदींनी मनोगत व्यक्त केले

याप्रसंगी तालुका उपाध्यक्ष अली भाई शेख, तालुका सरचिटणीस प्रभाकर हुजबंद,युवा जिल्हा उपाध्यक्ष जयदीप कुंदे, जेष्ठ नेते करिमखा पठाण,पुंजा आप्पा तासकर,युवा जिल्हा सरचिटणीस राहुल मोरे सचिव हर्षल देशमुख, युवा तालुका उपाध्यक्ष महेश क्षीरसाठ, उपाध्यक्ष विश्वजीत आहेर, सतिश भालेराव, सुरज साळवे, रवी आहेर, योगेश गवळे, पल्हा साळवे, भगवान पाटील, लखन खडताळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या उपस्थित होते.

## श्री माणकेश्वर वाचनालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : १०६ वर्षांची सामाजिक आणि सांस्कृतिक विचारांची परंपरा जोपासणाऱ्या निफाडच्या श्री माणकेश्वर वाचनालयामध्ये मराठी राजभाषा दिन तथा थोर साहित्यिक वि वा शिरवाडकर यांचा जन्मदिन उत्साह साजरा करण्यात आला. नाशिक जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष अण्णा पाटील बोरगुडे यांच्या हस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी श्री माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, उपाध्यक्षा डॉ.सौ. मेघा जंगम, वैनतेयविद्यालयाचे शिक्षक गुलाब टकले सर यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास सुरळीकर सर यांनी तर आभार प्रा. बाळासाहेब कापसे यांनी मानले

या कार्यक्रमास अण्णा पाटील बोरगुडे, गुलाब टकले सर, श्री माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, उपाध्यक्षा डॉ. सौ मेघा जंगम, चिटणीस प्रा. बाळासाहेब कापसे, हिशोब तपासणीस दत्ता काका उगावकर, संचालक सुहास सुरळीकर, अशोक पगारे, गुलाब टकले,ग्रंथपाल नितीन बनसोडे, आरती जंगम आदी उपस्थित होते.

## मोफत नेत्र तपासणी शिबिरात ३९२ जणांची तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव व आरोही सुनिल रोचकरी तिच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार २६ रोजी मोफत मोतीबिंदू निदान व नेत्रतपासणी शिबिरात जवळपास ४०० जणांनी तपासणी करून घेतली असून त्यापैकी ५१ जणांचे मोतीबिंदू ऑपरेशनची नोंद झाली.तर १६७ जणांना मोफत तपासणी करून चष्मे देण्यात आले. नगरसेवक सुनिल रोचकरी यांनी चष्मा वाटप केले यामध्ये पुरुषा बरोबर महिलांचे ही संख्या जास्त प्रमाणात होती.या कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी १० वाजता कुलस्वामिनी सूतगिरणीचे चेअरमन सुनील मधुकरराव चव्हाण व नगरीचे नगराध्यक्ष विनोद पिटूभैयया गंगणे व रामचंद्र रोचकरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

यावेळेस गटनेते औदुंबर कदम, आनंद (दादा) कंदले, नागेश नाना नाईक,शिवाजीदाजी बोधले गिरीष देवळालकर, अनंत कोंडोा, शांताराम पेंदे, विशाल रोचकरी, दिनेश क्षीरसागर, विजय (आबा)कंदले, नगरसेवक सागर कदम, माऊली भोसले लखन पेंदे तसेच नरेश अमृतराव, पंडितराव जगदाळे, आनंत सावंत अतुल दाजी बोधले, मधुकर शेळके दादासाहेब खपले, रत्नदिप भोसलेइत्यादी नगरसेवक उपस्थित होते. डोळ्यांची तपासणी पुणे सुप्रसिद्ध बुधराणी हॉस्पिटल येथील नेत्र डॉक्टर यांनी तपासणी केली.

## खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिवजयंती निमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेचे बक्षीस वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी प्रतिनिधी/हनुमंत पाटुळे : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रथमच घेण्यात आलेल्या शिवजयंती निमित्त, सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती खामसवाडी यांचे मार्फत सुंदर हस्ताक्षर स्पर्धा मराठी इंग्रजी, रंगभरण स्पर्धा व निबंध लेखन स्पर्धेत प्रथम द्वितीय तृतीय व उत्तेजनार्थ बक्षीसाचे वितरण दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले. यामध्ये इयत्ता पहिलीच्या सुंदर हस्ताक्षर मराठी प्रथम क्रमांक कु.अनन्या दीपक रोहिले, द्वितीय क्रमांक जोया चांदपाशा पठाण, तृतीय क्रमांक तेजस्वी तिबोले, इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा इयत्ता दुसरीमधून प्रथम क्रमांक आरोही लोखंडे, द्वितीय क्रमांक सानवी सावत, तृतीय क्रमांक सानवी शेळके, रंगभरन स्पर्धा इयत्ता तिसरी मधून प्रथम क्रमांक स्वराली रमेश शेळके, द्वितीय क्रमांक शर्वरी सुंदरराव माळी, तृतीय क्रमांक स्वरांजली बाबासाहेब माळी, तर निबंध स्पर्धा इयत्ता चौथी मधून प्रथम क्रमांक स्वराली विकास झोरी, द्वितीय क्रमांक अक्षता नितीन बाबर, तृतीय क्रमांक श्रेया सुभाष झोरी या विद्यार्थ्यांनी पटकावले.



या विद्यार्थ्यांना बक्षीस रूपात दर्जेदार शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या विद्यार्थ्यांना शाळेतील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी सार्वजनिक शिव जन्मोत्सव समिती खामसवाडी मधील अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोठुरे स्वा. सावरकर विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठून येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते एस. एल. हे होते. प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली असून. २६ फेब्रुवारी हा विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो, या प्रसंगी इयत्ता पाचवी ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वैयक्तिक गीत गायन, नाटक समूह गीत, गायन करून




मराठी भाषेला सन्मानित केले. शिक्षक संजय निकम यांनी कुसुमाग्रज यांचे नटसम्राट या नाटकाची प्रस्तुती आपल्या मोजक्या शब्दात केली. त्याचबरोबर श्रीमती चिखले यांनी कुसुमाग्रज एक कवी साहित्यिक नाटककार म्हणून ओळख करून दिली. सुधाकर निकम यांनी वि. वा. शिरवाडकर यांची कणा ही कविता आपल्या वाणीतून सादर करून सर्वांची मने जिंकली. अध्यक्षीय मनोगतात मुख्याध्यापक सातपुते एस. एल. यांनी जन सामान्यांनी स्वीकारलेल्या भाषांची ओळख करून देत असताना मराठी आपली भाषा आहे तिचा आपण गौरव करणे गरजेचे आहे . व्यासपीठावर सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षिकेतर कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कस्तुरी मोगल व ईश्वरी चांदोरे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांचे सहकार्य लाभले.

**वारकरी संप्रदायाच्या भावनांचा सन्मान राखत, समाधी सोहळ्यापूर्वी सर्वसंमतीने निर्णय घ्या; उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सूचना**

# अरण येथे संत सावता महाराज समाधी सोहळ्यासाठी पांडुरंगाच्या मूळ पादुका नेण्याच्या मागणीवर सभागृहात चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : संत परंपरेने समृद्ध असलेल्या महाराष्ट्रात संत शिरोमणी संत सावता महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्याला यंदा सुमारे ७३० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अरण येथे होणाऱ्या सोहळ्यासाठी पांडुरंगाच्या मूळ पादुका नेण्याच्या मागणीवर लक्षवेधीद्वारे चर्चा झाली. या विषयावर सभागृहात विविध सदस्यांनी मते मांडल्यानंतर पीठासीन अधिकारी म्हणून विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सर्व संबंधितांनी एकत्रित बैठक घेऊन सर्वसंमतीने निर्णय घ्यावा, अशा सूचना केल्या.

लक्षवेधी क्र. २ द्वारे सदस्य योगेश टिळेकर यांनी अरण येथे होणाऱ्या संत सावता महाराजांच्या समाधी सोहळ्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर मार्फत पांडुरंगाच्या मूळ पादुका आणण्याची मागणी मांडली. वारकरी संप्रदायाच्या भावना आणि संत परंपरेतील अध्यात्मिक संदर्भ लक्षात घेऊन समितीने आवश्यक तरतुदींमध्ये दुरुस्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच संबंधित न्यासच्या कामकाजाबाबत तक्रारींची चौकशी करून आवश्यक असल्यास प्रशासक नेमण्याची मागणीही करण्यात आली.

यावर उत्तर देताना राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी स्पष्ट केले की अरण येथे मूळ पादुका नेण्याची परंपरा अस्तित्वात नसून, सुमारे दीडशे वर्षांपासून स्थानिक परंपरेनुसार दुसऱ्या पादुकांची पालखी जाते. २०१४ पासून पंढरपूर ते आळंदी दरम्यान मूळ पादुका नेण्याची प्रथा सुरू झाली आहे; मात्र अरण संदर्भात अंतिम निर्णय संबंधित न्यासच्या बैठकीत घेतला जाईल. तक्रारी प्राप्त झाल्यास नियमानुसार चौकशी करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

चर्चेत सहभागी होताना सदस्य अमोल मिटकरी यांनी वारकरी संप्रदायाच्या भावनांचा आदर करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका मांडली. तसेच मंदिर समिती व न्यासच्या मुदतवाढ आणि कार्यपद्धतीबाबतही प्रश्न उपस्थित केले.

यावर उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संत परंपरा, वारकरी समाजाच्या भावना आणि कायदेशीर बाबी यांचा समतोल साधणे आवश्यक असल्याचे नमूद केले. न्यासातील अनेक सदस्यांची कालमर्यादा संपल्याने सद्यस्थितीत न्यासची नाममात्र असल्याने त्यांनाही निर्णय घेतांना मर्यादा येत आहेत .न्यासाची सद्यस्थितीनव संभाव्य मतभेद लक्षात घेता सर्व संबंधित घटक , परंपरा अभ्यासक , वारकरी प्रतिनिधी आणि कायदेविषयक तज्ज्ञ यांची बैठक घेऊन सर्वसंमतीने निर्णय घेण्याचा प्रयत्न करावा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. समाधी सोहळ्यापूर्वी निर्णय व्हावा, असेही त्यांनी सभागृहातून सुचित केले.

या चर्चेमुळे संत सावता महाराजांच्या समाधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अरण येथील धार्मिक परंपरा, वारकरी संप्रदायाच्या भावना आणि मंदिर समितीच्या अधिकारक्षेत्राचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

## छत्रपती संभाजीनगर शहरात स्वच्छतागृहे उपलब्ध करून देणार : राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : छत्रपती संभाजीनगर शहरात महानगरपालिकेकडून पे-अँण्ड्यूज पद्धतीवर २४ शौचालये चालविली जात असून, झोन क्रमांक १ ते १० अंतर्गत आणखी ४६ शौचालये बांधण्यात आली आहेत. तसेच, महानगरपालिकेच्या ३३ शाळांमध्ये महिलांसाठी व दिव्यांग व्यक्तींसाठी विशेष रॅम्पसह शौचालये कार्यरत आहेत. याशिवाय, स्वच्छ भारत अभियान २.० आणि स्वच्छ महाराष्ट्र मिशन अंतर्गत एकूण २१ नवीन स्वच्छतागृहांची बांधकामे सुरू असून ती लवकरच नागरिकांच्या वापरासाठी उपलब्ध होतील, असे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.. छत्रपती संभाजीनगर शहरात पुरेशी सार्वजनिक शौचालये उपलब्ध करून देण्याबाबत आमदार नारायण कुचे यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नास उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ बोलत होत्या. राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, औरंगपुरा व मकबरा रोडवरील दोन ठिकाणी महानगरपालिकेने शौचालये उभारली आहेत. त्यापैकी औरंगपुरा येथील महिलांसाठीचे शौचालय जय काल भैरवनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्याकडे तीन वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यात आले असून ते कार्यरत आहे. तर मकबरा रोडवरील शौचालय सध्या महानगरपालिकेमार्फतच वॉर्ड अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली चालविण्यात येत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आजपासून अक्कलकोटमध्ये मावा होणार हद्दपार

## आरोग्य समिती सभापती अविनाश मडीखांबे आणि नगरसेवक तम्मा मामा शेळके यांचा पुढाकार



**मिलन कल्याणशेट्टी**
नगराध्यक्ष



**रमाकांत डाके**
मुख्याधिकारी



**अविनाश मडीखांबे**
आरोग्य समिती सभापती



**तम्मा शेळके**
नगरसेवक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : आज शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी २६ पासून अक्कलकोट मध्ये मावा हद्दपार होणार आहे. यासाठी आरोग्य समिती सभापती अविनाश मडीखांबे आणि नगरसेवक तम्मा मामा शेळके यांनी पुढाकार घेतला असून या कामास नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांचे सहकार्य मिळत आहे. अक्कलकोट मध्ये जे कोणी मावा विक्री करतील त्यांच्यावर आणि मावा विक्री करणाऱ्या पान टपऱ्या चालक व दुकानदारांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

अक्कलकोट शहरातील चांगले रस्ते मावा खाऊन थुंकल्यामुळे रंगीत आणि अस्वच्छ झाले आहेत ही अस्वच्छता बघून नागरिकांना किळस येऊन उलट्या होण्याची वेळ आली होती. याची गंभीर दखल अक्कलकोट नगरपरिषदेचे नुतन सभापती अविनाश मडीखांबे आणि प्रभाग क्रमांक ०१चे नगरसेवक भिमराव उर्फ तम्मा मामा यांनी घेतली आणि अक्कलकोट शहरातील जागोजागी मोठ्या प्रमाणात होणारी मावा विक्री त्वरीत बंद करण्यात यावी आणि जे कोणी मावा विक्री करतील त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी या दोघांनी आज अक्कलकोट नगर परिषद चे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या कडे केली आहे. आरोग्य समितीचे सभापती अविनाश मडीखांबे आणि नगरसेवक तम्मा मामा शेळके यांच्या मागणीची दखल घेत मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी अक्कलकोट शहरातील जागोजागी विक्री होणारी मावा विक्री ची दुकाने टपऱ्या तात्काळ बंद करण्यात यावे अन्यथा गुन्हे दाखल करण्यात येईल असा इशारा दिला आहे यामुळे अक्कलकोट शहरातील अवैधपणाने विक्री केला जाणारा मावा आता बंद होणार आहे आरोग्यास घातक असलेल्या मावा ची अनेक दुकाने पान टपऱ्या अक्कलकोट येथे मोठ्या प्रमाणात असून या पान टपऱ्या समोर मोठ्या प्रमाणात मावा खाऊन रस्त्यावर थुंकले जात आहे यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून या मावा मुळे रस्ते लालभडक झाले आहेत आणि यामुळे रस्त्यावर अस्वच्छता निर्माण झाली आहे.

> **मावा खाण्याचे शरीरावर परिणाम घातक परिणाम होत असून या मावा मुळे तरुण वर्गात मोठे व्यसन जडले आहे. मावा खाऊन कुठेही रस्त्यावर थुंकून मोठ्या प्रमाणावर रस्ते अस्वच्छ आणि लालभडक केले जात आहेत त्यामुळे मावा विक्री बंद होणे गरजेचे झाले आहे.**
>
> **– भिमराव उर्फ तम्मा मामा शेळके**
> **नगरसेवक न. प. अक्कलकोट**

### मावा विक्री करणाऱ्या दुकानदारांवर होणार गुन्हे दाखल

> **या निर्णयाचे स्वागत नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी , मुख्याधिकारी रमाकांत ढाके ,पोलीस निरीक्षक दीपक भिताडे आणि पर्यावरणवादी सर्व नागरिकांनी स्वागत केले असून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी नागरिकांचा पाठिंबा मिळत असून नागरिकांच्या या मागणीचा सकारात्मक दृष्ट्या विचार केल्याचे समाधान नागरिकांन व्यक्त करत आहेत तसेच अक्कलकोट शहरात आणि नगरपरिषद च्या मालकीच्या शॉपिंग सेंटर च्या समोर आणि जागोजागी तसेच अयोध्या शॉपिंग सेंटर एस टी बस स्थानकासमोर मोठ्या प्रमाणात पान टपऱ्या मध्ये आणि तेथील हॉटेल्स समोर मावा खाऊन रस्त्यावर थुंकले जात असून घाणीचे साम्राज्य मल्लिकार्जुन मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर दररोजच निर्माण होत आहे त्यामुळे अशी घाण बंद होणे गरजेचे आहे**
>
> **– अविनाश मडीखांबे**
> **आरोग्य समिती सभापती,**
> **न. प. अक्कलकोट**

आरोग्य समितीचे सभापती अविनाश मडीखांबे यांनी आपल्या पदाची सुत्रे हाती घेतल्या नंतर त्यांनी अक्कलकोट मधील स्वच्छतेला प्राधान्य दिले आहेत. यामुळे अक्कलकोट मध्ये मावा विक्री मुळे होणारी घाण आणि अस्वच्छता दूर करण्यासाठी अक्कलकोट मध्ये जे कोणी मावा विक्री करत असतील त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील असा निर्णय मुख्याधिकारी यांनी घ्यावा अशी मागणी सभापती अविनाश मडीखांबे आणि नगरसेवक तम्मा मामा शेळके यांनी केली होती या तक्रारीची तातडीने दखल घेत मुख्याधिकारी यांनी मावा विक्री करण्यावर बंदी घातली जाईल आणि अक्कलकोट मधून मावा विक्री हद्दपार केली जाईल असे आश्वासन दिले असून या बाबत ची कारवाई लगेचच सुरू करण्यात येईल असे जाहीर केले आहेत त्यामुळे आज शनिवार दिनांक २८फेब्रुवारी पासून अक्कलकोट शहरातील मावा हद्दपार होणार असून जे कोणी मावा विकत असतील त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. त्यामुळे मावा विक्री करणाऱ्या दुकानदारांनी सावध व्हावे आणि मावा विक्री करू नये असे आवाहन मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी केले आहे.

# भूमि अभिलेख विभागाचा आक्रोश मोर्चा जमाबंदी कार्यालयावर धडकला




■ **महाराष्ट्र राज्य भूमी अभिलेख कर्मचारी कृती समितीच्या नेतृत्वात हजारो कर्मचाऱ्यांचा आक्रोश उतरला रस्त्यावर**

■ **जर शासनाने दखल घेतली नाही तर दिनांक २ मार्च पासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : आजपर्यंतच्या भूमि अभिलेखच्या इतिहासातील सर्वात मोठा मोर्चा काल दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी, महाराष्ट्र राज्य भूमी अभिलेख कर्मचारी कृती समितीच्या वतीने पुणे येथील जमाबंदी आयुक्त कार्यालयावर एक भव्य 'आक्रोश मोर्चा' आणि धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.

**आंदोलनाचे मुख्य कारण आणि मागण्या:–**

भूमी अभिलेख विभागातील कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी संघर्ष करत आहेत. त्यांच्या प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत:

१) तांत्रिक वेतनश्रेणी: भूमी अभिलेख विभागातील भूकरमापक (Surveyors) आणि इतर कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतनश्रेणी लागू करणे.

२) आकृतीबंध मंजूर करणे: विभागाचा सुधारित आकृतीबंध (Structure) मंजूर करून रिक्त पदे भरणे.

३) प्रवास भत्ता: मोजणी कर्मचाऱ्यांना निश्चित प्रवास भत्ता देऊन तो वेतनात समाविष्ट करणे.

४) खाजगीकरण रोखणे: विभागाच्या कामांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय रद्द करणे.

५) सॉफ्टवेअरमधील त्रुटी: 'ई-मोजणी व्हर्जन २' सॉफ्टवेअरमधील तांत्रिक अडचणी दूर करून ते सोपे करणे.

६) साहित्याचा पुरवठा: प्रत्येक कर्मचाऱ्याला स्वतंत्र रोव्हर, लॅपटॉप आणि इतर मोजणी साहित्य उपलब्ध करून देणे.

आंदोलनाची पार्श्वभूमी

हे आंदोलन अचानक झालेले नसून ते एका नियोजित टप्प्याटप्प्याने सुरू असलेल्या संघर्षाचा भाग होते:

१८ फेब्रुवारी: मोजणी साहित्य कार्यालयात जमा करून काळ्या फिती लावून काम केले.

२० फेब्रुवारी: मोजणीचे प्रत्यक्ष काम (Field Work) बंद करण्यात आले.

२३ ते २६ फेब्रुवारी: राज्यभरातील कर्मचारी सामूहिक रजेवर गेले होते, ज्यामुळे कार्यालयांचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले होते.

२७ फेब्रुवारी (काल): पुणे येथील जमाबंदी आयुक्त कार्यालयावर राज्यभरातून आलेल्या कर्मचाऱ्यांनी आक्रोश मोर्चा काढला.

सध्याची स्थिती आणि परिणाम

या आंदोलनामुळे संपूर्ण राज्यातील जमिनीची मोजणी, शासनाचे विविध जिल्ह्यात सुरु असलेले भुसंपादन मोजणी प्रकरणे, नकाशा मिळवणे आणि ७/१२ संबंधित तांत्रिक कामे रखडली आहेत. सामान्य नागरिकांना, विशेषतः ज्यांच्या मोजणीच्या तारखा या काळात होत्या, त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

जर सरकारने या मागण्यांची तातडीने दखल घेतली नाही, तर २ मार्च २०२६ पासून कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा महाराष्ट्र राज्य भूमी अभिलेख कर्मचारी कृती समितीचे राज्य समन्वयक यांनी दिला आहे.

तसेच जर शासनाने या शांततापूर्ण आंदोलनाची दखल घेतली नाही तर पुढील भव्य असा आक्रोश मोर्चा हा मंत्रालयावर काढण्यात येईल असे महाराष्ट्र राज्य भूमी अभिलेख कर्मचारी कृती समितीचे राज्य समन्वयक रमेश सरकटे, सुनिल गोडसे, गजानन इंगळे, दिपाली मुरकुटे, पवन केवटे, अभय पाटील, मिलिंद जगताप, रवि डिक्रुज, किशोर इंगळे,विभूतीचंद्र गजभिये, कमलाकर पोतदार तसेच इतर पदाधिकारी यांनी दिला आहे.

# बोपगावच्या शेतकरी कुटुंबातील विजय फडतरे याची रिजनल रूरल बँकेत (स्केल १) अधिकारीपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/ डॉ. विनायक गायकवाड : बोपगांव येथील शेतकरी कुटुंबातील तरुण विजय संजय फडतरे यांनी जिद्द, चिकाटी आणि कुटुंबाच्या पाठबळाच्या जोरावर मोठे यश संपादन केले आहे. गुजरातमधील रिजनल रूरल बँकेत प्रोबेशनरी ऑफिसर (स्केल- १) या पदासाठी त्यांची निवड झाली आहे. त्यामुळे बोपगाव पंचक्रोशीच्या वतीने त्यांच्या या यशाबद्दल त्यांचा सत्कार घेण्यात आला.

कै. जगन्नाथ शंकर फडतरे यांचे नातू व संजय जगन्नाथ फडतरे यांचे सुपुत्र असलेले विजय फडतरे हे शेतकरी कुटुंबातून आले आहेत. त्यांचे चुलते तुकाराम जगन्नाथ फडतरे यांनी लहानपणापासूनच मोठं व्हा, अभ्यास करा आणि कुटुंबाचं नाव उज्ज्वल करा, हा मंत्र दिला. कुटुंबाकडे १३ एकर बागायती जमीन असूनही चुलत्यांनी विजय यांना कधीच शेतात कामाला लावले नाही, तर पूर्णवेळ अभ्यासासाठी प्रोत्साहन दिले.

विजय फडतरे यांनी स्पर्धा परीक्षेच्या वाटचालीत दोन वेळा अपयश स्वीकारले. मात्र, खचून न जाता अधिक मेहनत घेत आरआरबी प्रोबेशनरी ऑफिसर (स्केल-१) पद मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली.

सत्कारावेळी वडील संजय जगन्नाथ फडतरे, आई छाया संजय फडतरे, चुलते तुकाराम जगन्नाथ फडतरे, चुलती, चुलत बंधू तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी योगेश फडतरे व इतर कुटुंबीय उपस्थित होते. तालुक्यातील अनेक मान्यवरांनी विजय फडतरे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# श्री स्वामी समर्थांच्या सुलभ दर्शनाने आम्ही भारावलो : न्यायमुर्ती हितेश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वेणेगावकर : मंदीर समितीच्या सेवाभावी सेवेच्या माध्यमातून तथा श्री स्वामी समर्थांच्या सुलभ दर्शन प्रणालीतून येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात आम्हाला लाभलेल्या सुलभ स्वामी दर्शनाने आम्ही भारावलो असल्याचे मनोगत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती हितेश वेणेगावकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानास सहकुटूंब भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांनी न्यायमूर्ती हितेश वेणेगावकर व कुटूंबियांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला. यावेळी न्यायमुर्ती हितेश वेणेगावकर बोलत होते.

पुढे बोलताना न्यायमुर्ती हितेश वेणेगावकर यांनी विविध भागांमध्ये अनेक स्वामी भक्तांची भक्ती पाहून स्वामींच्या दर्शनाकरीता येथे येण्याची प्रेरणा लाभली. यामुळेच आज येथे आल्यानंतर मंदीर समितीच्या सहकार्याने व महेश इंगळे यांच्या आदरतिथ्याने कुटूंबासमवेत सुलभ स्वामी दर्शनाचा लाभ घेता आला असल्याने महेश इंगळे, प्रथमेश इंगळे व मंदीर समितीचे आपण शत:श ऋणी असल्याचे मनोगतही व्यक्त केले. याप्रसंगी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीकांत मलवे, अविनाश सुरवसे, विपूल जाधव, सागर गोंडाळ इत्यादी उपस्थित होते.

### श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी आल्यानंतर न्यायमुर्ती हितेश वेणेगावकर यांचे मनोगत

**वडाळा येथील महा विधी सेवा शिबिराचे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार व न्यायमूर्ती फिरदोश पूनीवाला यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले.**

# सर्वसामान्य नागरिक न्यायापासून वंचित राहू नये हाच महा शिबिर आयोजनाचा उद्देश: न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**या महा शिबिरात विविध शासकीय यंत्रणांच्या स्टॉलला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, नागरिकांनी शासकीय योजनांची, नियमांची माहिती जाणून घेतली.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : पूर्वी राजेशाही होती व राज्यकर्त्यांचे राज्य होते तर आता देशात प्रजासत्ताक लोककल्याणकारी न्यायव्यवस्था आहे. समाजात खूप मोठी विषमता असून आर्थिक विषमतेमुळे अज्ञानामुळे बरेचसे लोक न्याय प्रक्रियेपासून दूर राहतात, त्यांना शासकीय योजनांची, नियमांची माहिती होऊन आर्थिक लाभ मिळावा. न्याय हा सर्वांसाठी आहे, न्यायापासून कोणीही वंचित राहू नये हाच या महा विधी शिबिराचा उद्देश आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांनी केले.

मा. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली, मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर व जिल्हा प्रशासन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विधी सेवा महा शिबिर, शासकीय कल्याणकारी योजनांचा महामेळावा या कार्यक्रमाचे व शासकीय योजनांच्या स्टोलचे उद्घाटन मा. न्यायमूर्ती श्री निजामुद्दीन जमादार व मा. न्यायमूर्ती फिरदोस पूनीवाला यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष श्री. मनोज शर्मा, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड. बाबासाहेब जाधव आदी मान्यवर व शासकीय अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

न्यायमूर्ती श्री.जमादार म्हणाले की राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून आज या महा विधी सेवा शिबिराचे आयोजन केले आहे. विज्ञान हे प्रमाण मागते तर न्याय हे सत्य मागते. समाजातील गरीब लोकांना न्यायालयापर्यंत येता येत नाही, त्यांना न्याय मिळत नाही ,म्हणून विधी सेवा प्राधिकरणाची निर्मिती करण्यात आली. या विधी सेवा प्राधिकरणाचे मुख्य तीन टप्पे आहेत. सुरुवातीला इ.स.१९८७ साली या विधी सेवा अंतर्गत पक्षकाराला सरकारी वकील देण्यास सुरुवात झाली, त्यानंतर पुढे याची व्याप्ती वाढू लागली व दुसऱ्या टप्प्यात खेडोपाडी गरीब लोकांना त्याची माहिती व्हावी, न्यायप्रक्रियेत त्यांनी सहभागी व्हावे, त्यांना न्याय मिळावा म्हणून न्यायालयीन शिबिर, लोक अदालतीचे आयोजन केले आणि तिसऱ्या टप्प्यात लोकांना हक्क, न्याय, अधिकार, योजना शासकीय यंत्रणा याबाबतीत अधिकाधिक माहिती होऊन त्यांच्या हक्काबाबत जनजागृती करणे व समाजातील कुठलाही घटक न्यायापासून वंचित राहू नये यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असे त्यांनी सुचित केले.

न्यायमूर्ती श्री. पूनीवाला यांनी मार्गदर्शन करताना न्याय हा निव्वळ निर्णय नसून लोकशाही मजबूत करणारा आहे. समाजातील गरिबातील गरीब माणसांना न्यायीकरणाचा व शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा म्हणून विधी सेवा प्राधिकरण अशा शिबिरांचे आयोजन करत असल्याचे त्यांनी सांगितले. तर पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी पोलीस, जनता आणि न्यायिक विधी सेवा यांचा समन्वय या विधी सेवा प्राधिकरणामुळे स्पष्ट होत आहे. सर्वसामान्यांना न्याय मिळावा यासाठी पोलीस प्रशासन ही प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री मनोज शर्मा यांनी केले. सामाजिक व आर्थिक विषमतेमुळे समाजातील तळागाळातील जनसामान्यांना न्याय मिळावा हाच उद्देश या कायद्याचा असून जनसामान्यांना कायद्याची व शासकीय योजनांची, त्यांच्या हक्कांची माहिती व्हावी यासाठी विधी सेवा महाशिबीराचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विधी सेवा काळाची गरज- बालविवाह व घर आपल्या दोघांचे हे जनजागृती पर पथनाट्य सादर केले. तसेच शासकीय योजनांचे लाभार्थी यांना शासकीय योजनांचा लाभ प्रातिनिधिक स्वरूपात तर पोलिसांच्या शोध कामगिरीतून सापडलेला मुद्देमाल प्रतिमात्मक स्वरूपात लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जिल्हा विधी से.प्रा. सचिव पी.पी. पेटकर यांनी केले. वडाळा येथील या महा शिबिरातील शासकीय यंत्रणांच्या माहितीपर व मार्गदर्शन पर स्टॉल ला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# ‘अकलूज नंतर आता अक्कलकोट’ राजकीय कनेक्शन; गोरे अन् कल्याणशेट्टींच.....

## जिल्हापरिषद अध्यक्षपदासाठी सांगोल्याचे चेतनसिंह केदार, होटगीचे रामप्पा चिवडशेट्टी यांच्या नावाची चर्चा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्हा परिषदेचा अध्यक्ष आणि इतर पदाधिकारी निवडी लवकरच होणार आ-हेत. जिल्हाधिकाऱ्यांकडून केवळ तारीख काढणे बाकी आहे. दरम्यान नुकत्याच झालेल्या महानगरपालिका नगरपालिका आणि जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचा दबदबा दिसून आला.

महापालिकेनंतर जिल्हा परिषदेवर भारतीय जनता पार्टीने एक हाती वर्चस्व मिळवले आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे या विजयाचे किंग मेकर ठरले आहे. याचबरोबर आता आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा सुद्धा जिल्ह्यात दबदबा निर्माण झाला आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष पदासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पत्नी नूतन जिल्हा परिषद सदस्य शांभवी कल्याणशेट्टी यांच्या नावाची जोरदार चर्चा ऐकण्यास मिळाली अजूनही त्यांच्या नावाची चर्चा होत आहे परंतु त्यांनी नकार दिल्याचे समजते.

भविष्यात सचिन दादांना मिळणारे मंत्रिपद अध्यक्षपदामुळे जाईल असेही या निमित्त बोलले जात आहे. अध्यक्ष पदापेक्षा सोलापूर जिल्ह्याला मंत्रीपद महत्त्वाचे आहे.

काही का असेना जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी निवडीत अक्कलकोट केंद्रस्थानी राहणार हे मात्र नक्की आहे. पूर्वी जिल्ह्यावर मोहिते पाटील यांचे वर्चस्व होते. जिल्हा परिषदेत ते सांगेल ते पदाधिकारी व्हायचे त्यावेळी अकलूज केंद्रबिंदू होता पण आता अकलूज नाही तर अक्कलकोट जिल्ह्याचे राजकीय केंद्रबिंदू ठरत आहे. जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी निवडीत पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी ही दोन नेते ठरवतील तेच होणार ही काळा दगडावरची रेष आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून गोरे, कल्याणशेट्टी यांना मिळणारच सपोर्ट हा बरेच काही सांगून जातो.

शांभवी कल्याणशेट्टी यांनी अध्यक्षपदासाठी नकार दिल्यानंतर आता सांगोल्याचे भाजपचे अध्यक्ष चेतनसिंह केदार, होटगीचे रामप्पा चिवडशेट्टी यांच्या नावाची चर्चा आहे. पण अध्यक्ष पद बार्शी, सांगोला, माढा, पंढरपूर, करमाळा यापैकी कोणत्या तालुक्याकडे जाईल याची उत्सुकता सर्वाधिक आहे.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मधील प्राध्यापकांच्या पेटंटला भारत सरकारकडून मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : ‘गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) मधील प्राध्यापकांनी फाईल केलेल्या पेटंटला भारत सरकारच्या पेटंट विभागाकडून मान्यता प्राप्त झाली आहे.’ त्यामुळे त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अभियांत्रिकीच्या क्षेत्रामध्ये सातत्याने नवनवीन गोष्टींचे संशोधन चालू असते. ‘आयओटी बेस्ड डिजिटल अल्ट्रासोनिक पल्स व्हेलोसिटी टेस्ट डिव्हाईस’ हे काँक्रीट संरचनांचे विनाशक नस-लेले (नॉन डीस्ट्रेक्टिव्ह) मूल्यमापन करण्यासाठी विशेषतः डिझाइन केलेले एक स्मार्ट उपकरण आहे. या डिझाइनमध्ये एकात्मिक हाऊसिंग युनिट असून त्यामध्ये अल्ट्रासोनिक ट्रान्सड्यूसर्स, डिजिटल डिस्प्ले इंटरफेस आणि वायरलेस एलओटी कम्युनिकेशन मॉड्यूल्स अंतर्भूत आहेत. याची बाह्य रचना आकर्षक, संक्षिप्त व पोर्टेबल केसिंगसह असून एर्गोनॉमिक प्रोब होल्डर्स आणि सुबकपणे मांडलेले कंट्रोल पॅनेल लेआउट यांचा समावेश आहे. नवोन्मेषी बाह्य आकार, घटकांची मांडणी आणि वापरकर्ता-अनुकूल इंटरफेसची सौंदर्यात्मक रचना यांमुळे या उपकरणाच्या डिझाइन पेटंट अंतर्गत दावा केलेल्या नवीन डिझाइनची वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. प्राध्यापकांनी तयार केलेल्या या उपकरणामुळे रिअल-टाइम मॉनिटरिंग, अचूक व विश्वसनीय मोजमाप, डेटा ऑटो-सेव्ह व क्लाउड स्टोरेज, रिपोर्ट जनरेशन सोपे, रिमोट ॲक्सेस व कंट्रोल, वेळ व खर्च बचत, संरचनेची गुणवत्ता तपासणी सोपी होते, डेटा ॲनालिटिक्स व ट्रेंड विश्लेषण, पारदर्शकता व ट्रेसिबिलिटी असे भविष्यात फायदे होतात. भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून ह्या उपकरणाच्या पेटंटचे प्रमाणपत्र मिळाले आहे. या पेटंटसाठी सिव्हिल इंजिनिरिंगचे विभागप्रमुख डॉ. प्रशांत रमेश बामणे, प्रा.गणेश कुमार कोष्टी, प्रा.निशिगंधा वैजनाथ महामुनी, प्रा.अविनाश बाबासो कोकरे, प्रा. अमृता लुगडे, प्रा.आरती भानवसे व प्रा.वैभवी गलांडे या सात प्राध्यापकांनी अभ्यास केला होता. बरेच दिवस काम केल्यानंतर त्यांना हे यश मिळाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग च्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, संशोधन अधिष्ठाता डॉ.अभिषेक एम.एस., इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

**संशोधन विभागाला आणखी मिळाली गती**

# माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती सम्यक विद्यार्थी आंदोलन साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने साजरी करण्यात आली.

सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने सी, बी खेडगी महाविद्यालयात त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी माता रमाईच्या प्रतिमेचे पूजन उपप्राचार्य प्रा.वैद्य मॅडम आणि प्रा.भरमशेट्टी सर यांच्या हस्ते करण्यात आले

सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रविराज पोटे यांनी विद्यार्थ्यांना एकत्रित केले आणि १२ वर्षापासून सामाजिक उपक्रमाची परंपरा कायम ठेवली, अनेक विद्यार्थ्यांचे प्रश्न पाठपुरावा करून त्यांनी सोडवले आहेत त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी प्रगती केली आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात, घडवण्यात, रविराज पोटे यांचे योगदान आहे असे प्रतिपादन उप प्राचार्य आणि प्राध्यापकांनी केले.

तसेच अखंड १८ तास अभ्यास अभिवादनाच्या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्त रविराज पोटे, साहिल कांबळे, प्रीती जैनजांगडे, निरंजन मस्के, लक्ष्मण अड्डद, सृष्टी गायकवाड, दिव्या लोखंडे, आदिसह विद्यार्थी मुलं मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संयुक्त जयंतीनिमित्त रचना संस्थेचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



संभाजीनगर : रचना संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने गुरु रविदास, राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले तसेच माता रमाई यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित भव्य सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष इंजि. एस. डी. पानझडे होते, तर उद्घाटन माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त उप-महानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक साहेबराव नामदेवराव दुतोंडे, देऊळगाव राजा नगरपालिकेच्या नगराध्यक्षा माधुरीताई तुषार शिपणे, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगरच्या नगरसेविका गंगाताई भिमराव भवरे (कुचे), जेष्ठ समाजसेवक रघुनाथ पद्मे तसेच जिल्हा परिषद सदस्य अमोल बाबुराव लोहकरे यांची उप-स्थिती लाभली.

या प्रसंगी नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या सदस्यांचा तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जेष्ठ समाजसेवकांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त तथा जिल्हा परिषद सदस्य बालाजी रघुनाथ सोनटक्के, जेष्ठ समाजसेवक सुरेश लक्ष्मणराव गवळे, नगरसेवक नंदलाल सुरेश गवळे, सुधाकर बाबुराव गायकवाड, लताबाई साईनाथ कानडे, मनोज बन्सीलाल गांगवे, पुष्पाताई उत्तमराव रोजतकर, उज्वल देविदास कुचे, कारभारी देवराव लोहकरे तसेच सुनंदा स्वप्नील अडसुळे आदी मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सी. एम. रमणे यांनी केले, तर प्रास्ताविक रतिलाल कुचे यांनी केले. यावेळी माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर तसेच ग. म. पिंजरकर यांनी मार्गदर्शन करताना महापुरुषांच्या विचारांचा समाजजीवनात अवलंब करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे अध्यक्ष सखारामजी पानझडे यांनी रचना संस्थेच्या पुढील वाटचालीत समाजहिताचे विविध उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इंजि. अनिल निंभोरे यांनी केले. यावेळी हिरालाल गतखणे, इंजि. पी.एस. टोम्पे माजी अखज शंकर बावस्कर प्रविण बोर्डे, रमेश डोंगरे आदींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

हा सोहळा सामाजिक एकात्मता वृद्धिंगत करणारा आणि समाजातील प्रेरणादायी कार्याचा गौरव करणारा ठरला.

# वैनतेय विद्यालयात मराठी राजभाषा दिन विविध उपक्रमांनी साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील वैनतेय विद्यालयात मराठी राजभाषा दिनानिमित्त, ज्ञानेश्वरी ग्रंथ, ओवी वाचन व निरूपण, कविता वाचन, ,समूहगीत, जात्यावरच्या ओव्या , अंगाई गीत, वाचन कट्टा हे व इतर कार्यक्रम सादर करण्यात आले.

यावेळी बी.वाय. के. कॉलेजचे माजी प्राचार्य,प्रा. डॉ. केशव शिंपी, न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा. व्यवहारे, संस्थेचे सचिव रतन पाटील वडघुले, बाळासाहेब कासार, विद्यालयाच्या प्राचार्या मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर, पर्यवेक्षक बी.बी गुंजाळ, पर्यवेक्षिका श्रीमती आर .एम .लाहोटी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले प्रास्ताविक उपप्राचार्य सुभाष खाटेकर यांनी केले याप्रसंगी ज्ञानेश्वरी ग्रंथ ,ओवी वाचन व निरूपण एस. यु. वाघ आणि श्रीमती एस एस पवार यांनी केले.

शब्दकोश विश्वकोश व व्युपत्ती कोश परिचय समृद्धी सांगळे रुद्राक्षी शिंदे , दुर्वा बस्ते यांनी करून दिला गणेश कुयटे यांनी कुसुमाग्रजांच्या जीवन कार्यावर माहिती सांगितली गौरी गाजरे या विद्यार्थिनीने माझे जगणे होते गाणे तर अनुजा देवरे या विद्यार्थिनीने कणा या कवितेचे वाचन केले इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी कृती सह जात्यावरच्या ओव्या सादर केल्या लीळाचरित्र ग्रंथाची माहिती श्रीमती एस एस पवार यांनी दिली.

स्थान मानाच जगात देऊ मराठी भाषेला हे समूहगीत विद्यार्थ्यांनींनी सादर केले शिवाय बीज जसे अंकुरले या गीता-वर आधारित समूहनृत्य सादर करण्यात आले इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला ग बाई हे अंगाई गीत सादर केले,तमन्ना पठाण, विद्या टोपे, वैष्णवी गायकवाड, चैताली चोरडिया, गौरी गाजरे, अनुजा देवरे विद्यार्थिनींनी,बोली भाषा सादरीकरण केले. श्रावणी तांबे या विद्यार्थिनींने लावणी नृत्य सादर केले.

प्रा.डॉ. केशव शिंपी यांनी मराठी भाषेचे महत्व बोली भाषा, सांस्कृतिक, ग्रामीण, प्रमाण भाषा ज्ञान घेण्यासाठी मातृभाषा महत्व विशद केले. संत परमपरेचे भाषा समृद्धी साठी योगदान विविध अभांगतून स्पष्ट केले. याप्रसंगी वि दा व्यवहारे यांचे भाषण झाले,जागर वाचन संस्कृतीचा या उपक्रमांतर्गत निफाड शहरात वाचन कट्टा लावण्यात आला होता. नागरिकांनी या ठिकाणी पुस्तक वाचनाचा आनंद घेतला, भित्ती पत्रिका व साहित्यिक उत-रे पत्रिका प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले सूत्रसंचालन रशीद पठाण यांनी तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका श्रीमती आर एम लाहोटी यांनी केले.

**ज्ञानेश्वरी ग्रंथ, ओवी वाचन व निरूपण, कविता वाचन, समूहगीत, जात्यावरच्या ओव्या, अंगाई गीत, वाचन कट्टा व विविध कार्यक्रम केले सादर**

**पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि समाजाविषयीची खरी तळमळ**

# गोगांवचे कर्तबगार उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांचे कार्य कौतुकास्पद : सरपंच वनिता सुरवसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




अक्कलकोट/प्रतिनिधी : गोगांव ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री कमलाकर सोनकांबळे यांनी मागासवर्गीय समाजाच्या उन्नतीसाठी केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आणि प्रेरणादायी आहे. पदाची जबाबदारी पार पाडताना त्यांनी केवळ कर्तव्य निभावले नाही, तर समाजासाठी समर्पित भावनेने सातत्याने काम केले आहे.

शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहोचवणे, वंचित व गरजू घटकांना न्याय मिळवून देणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळवून देणे, युवकांना योग्य मार्गदर्शन करणे तसेच पाणी, रस्ते, गटार व प्रकाश व्यवस्था अशा मूलभूत सुविधांसाठी सातत्याने पाठपुरावा करणे - या सर्व क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजा-वली आहे.

त्यांच्या कार्यशैलीत पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि समाजाविषयीची खरी तळमळ दिसून येते. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक कुटुंबांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून आला असून मागासवर्गीय समाजाला नवा आत्मविश्वास मिळाला आहे.

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दाखवलेली जिद्द आणि चिकाटी ही गोगांवसाठी अभिमानाची बाब आहे.

गोगांव ग्रामपंचायतीच्या वतीने आणि वैयक्तिकरित्या मी, सरपंच सौ. वनिता सुरवसे, त्यांच्या कार्याचे मनःपूर्वक अभिनंदन करते व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देते.

**त्यांचे समाजहिताचे कार्य असेच अविरत सुरू राहो, हीच सदिच्छा!**

समाजसेवा हीच खरी नेतृत्वाची ओळख - आणि आपल्या उपसरपंचांनी ती कृतीतून सिद्ध केली आहे!असे मत सरपंच यांनी केले

उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या पाठपुरावाने आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या सहकार्याने आणि सरपंच वनिता सुरवसे व प्रदीप जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली रमाई आवास योजना अंतर्गत १४ घरकुल मंजूर झाले असून गेल्या पाच वर्षात मागासवर्गीय वस्तीमध्ये ४१ घरकुल मंजुरी केली

कमलाकर सोनकांबळे यांनी उपसरपंच म्हणून काम करत असताना सरपंच वनिता सुरवसे व भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप यांच्या मार्गदर्शना खाली वंचित घटकातील लाभार्थी व वस्तीचे विकास कामासाठी प्राधान्य देण्याचे काम केले आहेत त्यात प्रामुख्याने बंदिस्त गटार सिमेंट रस्ता डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृह आणभाऊ साठे नगर येथे सभामंडप, पेव्हर ब्लॉक असे विविध कामे केले आहेत